# स्वप्नविहंग

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2302

REFBK-0021614
REFBK-0021614

राधेय
प्रकाशन,
नागपूर-१०

प्रा. सौ. सुनेत्रा देशपांडे
एम्. ए.

# स्वप्नविध्दा

प्रा. सौ. सुनेत्रा देशपांडे

एम्. ए.

REFBK-0021614

राधेय प्रकाशन, नागपूर-१०

प्रकाशक :

रा. कृ. येरकुंटवार

'राधेय प्रकाशन', २०५, पश्चिम उच्च न्यायालय मार्ग,
धरमपेठ, नागपूर – १०

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

आवृत्ती पहिली : १६ डिसेंबर १९७६

मुद्रक :

श्री. वि. गंधे, एम्. ए., डी. पी. एड्.
प्रदीप मुद्रणालय, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर – १०

मूल्य : सहा रुपये

# स्वप्नविहग

# दोन शब्द

"काव्यसंग्रह" प्रसिद्ध करण्याच्या कामात फार धोके असतात याची जाणीव असूनहि मी "स्वप्नविद्धा" हा काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचे धाडस केले आहे. या पुस्तकात दोन भाग असून पहिल्या भागातील कवितांचे श्रेय प्रा. सौ. सुनेत्रा देशपांडे यांचे आणि दुसऱ्या भागातील काव्य त्यांचे पती श्री. चंद्रशेखर देशपांडे यांचे आहे. या नाविन्यपूर्ण योगामुळेच मी या कार्याला प्रवृत्त झालो.

प्रकाशनाच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकीत असताना माझे मार्गदर्शक मित्रवर्य प्राचार्य राम शेवाळकर व सुप्रसिद्ध कवि व लेखक श्री. वा. रा. सोनार यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळेच मी हे धाडस करीत आहे. त्यांचे मार्गदर्शन मला सतत लाभेल ही जाणीव ठेऊन त्यांच्या ऋणातच राहण्यात मी समाधान मानतो.

प्रा. सौ. सुनेत्रा देशपांडे यांची द्रौपदीच्या जीवनावरील कादंबरी "अग्निकन्या" ही प्रसिद्धीच्या मार्गावर आहे.

प्रदीप मुद्रणालयाचे मालक व आमचे मित्र श्री. श्री. वि. उपाख्य मामासाहेब गंधे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सुबक छपाई करून जे सहकार्य दिले याबद्दल मी ऋणी आहे. त्यांचे सहकार्य सदोदित मिळावे ही अपेक्षा.

पुस्तकाचे मूल्यमापन रसिक वाचकांनीच करावे.

नागपूर
१०-१२-१९७६

**रा. कृ. येरकुंटवार**

○ ○

ओल्या मातीतून ज्यांनी
घडवलं आजचं शिल्प
त्यांनाच-

○ ○

अंतरात आळवले गेलेले सूर ओठावर तर आलेच
पण त्याच बरोबर पुस्तक रुपानं प्रकाशितहि होताहेत.
शब्दांची ही पहिली वहिली ओंजळ वहाताना
इंद्रधनुचे रंग खुलताहेत
मनाच्या क्षितिजावर...
त्या रंगातहि रंग भरण्यासाठी
माझ्या पतींनी आपल्या कविता
प्रकाशित करण्याची मला परवानगी दिली.
त्याबद्दल
अं हं !...
आभार मानणं परकेपणाचं
पण तरीहि अपरिहार्यच !

आमचे एक चांगले मित्र
श्री. नंदकिशोर भार्गव यांच्या प्रेरणेनेच ही अंजली
वाहिली जातेय याचा विसरं कसा पडावा ?

आणि 'राधेय प्रकाशनाचे' श्री. राम येरकुंटवार
यांच्या खेरीज ही ओंजळ वाहिलीच गेली नसती.

पण कुणाचे कसे आभार मानायचे ?
सारे आहेत आपलेच.

फक्त हा जिव्हाळा रसिकांकडूनहि लाभावा
हीच अपेक्षा.

– सौ. सुनेत्रा देशपांडे

● ●

# ॥ १ ॥

प्रा. सौ. सुनेत्रा देशपांडे

१

ओठावरच्या सुरांना
बांध घालू नकोस
मनाचे बांधच
वाहून जातील...

उमलत्या कळ्यांना
कुंपण घालूं नकोस
कुंपणच कदाचित
कांटा रुतवील ..

# १

स्वप्नांतल्या राजकुमारा
जेव्हा स्वप्नातल्या स्वप्नाचं चंदेरी गीत
तुझ्या डोळयांत वाचते ना
तेव्हा मी सिद्धेला असते,
फुलपांखरी पंखावर बसून तुला शोधणारी !

जेव्हा तू जवळ असतोस ना,
तेव्हा मी तुला स्वप्नांत शोधते...
आणि स्वप्नांत येतोस ना
तेव्हा अगदी जवळ श्वासांच्या गंधाने
वेढून टाकते...

जेव्हा तू माझा असतोस ना
तेव्हा मी कितीतरी दूर असते
योजनांच्या पलीकडे...

जेव्हा तू परका बनतोस ना
तेव्हा तू
फक्त फक्त माझाच
असतोस...

जेव्हा ओठावर गीत असतं ना
तेव्हा सूरच हरवून जातात

जेव्हा सूर गवसतो ना
तेव्हा शब्द मुके होतात

जेव्हा आपण दोन असतो ना
तेव्हा आपण एक बनतो

जेव्हा आपण एकच असतो ना
तेव्हा बेरीज येते
फक्त...दोन शून्ये...

● ●

## ३

मी कधीची याचक बनून
तुझ्या दारात ताटकळत होते
दान मागायचं होतं, पण भीक नको वाटली
पण मी तरी वेडीच किनई
दात्याच्या दृष्टीनं–
दान आणि भीक एकच असते–
अन् हे मला कधी कळलंच नाही

● ●

## ४

खोटं नाही सांगत तुला,
तुझी शपथ...
माझ्या घरातल्या अंधाराला किनई
खूप खूप रंग आहेत
पण जेव्हा तू येतोस ना तेव्हा–
...तेव्हा–
. .माझ्या घरातला अंधार फक्त सोनेरी होतो
निळ्या डोळ्यांनी पाहून सुद्धा...

● ●

## ५

जेव्हा जगत होते मी स्वप्नामध्ये
व्यथा कधी खुपलीच नाही
चंदेरी स्वप्नांच्या प्रतीक्षेत जगताना...
मी स्वत:हि स्वप्नच बनले होते
जगानं केलेल्या प्रतारणेचा जहरी घोट
स्वप्नांच्या सोनेरी पेल्यातून
हंसत हंसत घेतला
पण आता मात्र जगणं फार फार कठीण आहे
कारण...
आज माझ्या स्वप्नांनी देखील
मला दगा दिला आहे

● ●

## ६

स्वप्नांच्या कोषातली...
तुझ्या माझ्या विश्वातली...
गंधित सोनेरी पंखाची...
स्वप्नांची पाखरं तू पाहीलीस ?

त्या तिथे क्षितिजापलीकडे
घायाळ होउन पडलीत ती
मखमली पंखावर उबदार हात फिरवणाऱ्या
मृत्युची वाट पहात...

केविलवाण्या सुरांनी
ती तुला मला विचारताहेत
कशाला दिलेत आम्हांला पंख
नसलेल्या आकाशातल्या वेड्या भरारीसाठी
वांझ यातना सोसण्यासाठीच ना ?

पुन्हा पुन्हा नका रे
असा जीवघेणा खेळ खेळु...
पंखांतलं गीत उसवण्याचा !

तुम्हाला तुमच्या स्वप्नांची शपथ आहे...!

## ७

श्वासांच्याहि पलीकडे काहीतरी असेल का ?
...असलंच अस्तित्व कदाचित आत्म्याचं...
तर...
तो आत्मा मी विकत घेतलाय...
माझं सारं सर्वस्व पणाला लावून...
आता तुला निसटता येणार नाही कधीच—
पार्थिव अर्थानं जाशीलहि दूर
पण...
जेव्हा हे बंध खेचले जातील
तेव्हा...तेव्हा...विरघळून जाशील तू माझ्यात
हातात आत्मा घेउन येइन मी...
तुझ्या डोळ्यांतल्या सौदागराशी सौदा करायला...
.. आणि मोल न मागताच देउन टाकीन—
माझा आत्मा तुला—
अशाच एखाद्या मुहुर्तावर...

● ●

## ८

आपण कांचापाणी खेळूया का ?
माझ्यापाशी खूप खूप कांचा आहेत.
लाल, हिरव्या, निळ्या आणि सोनेरी सुद्धा
त्यातल्या हव्या त्या तू घे.
उरलेल्या माझ्यासाठी–
मग त्या उरलेल्या कांचांचं मी तोरण बांधीन...
माझ्या घराच्या दारावर–
तुटक्या कांचांचं–
सुंदर भासणार...
नाही तर त्यांचं सुंदर खेळणं बनवीन
वेगवेगळे आकार दाखवणारं...
मी तुझ्याशी कांचासाठी भांडणार नाही.
कारण त्या कांचा आहेत
तुझ्याच डोळ्यांतल्या स्वप्नांच्या...!

● ●

# १

चंद्र तुझाच आहे–
नक्षत्रांची चार फुलं माझ्या ओंजळीत टाकशील का ?
उन्हाच्या तुऱ्यांनी झळकणारी पहाट तुझ्यासाठीच असू दे...
फक्त एक कवडसा सोनेरी संध्याकाळचा...
उधार देशील का ?
स्वप्न तुलाच असू दे...
अश्रूच्या थेंबाथेंबातलं प्रतिबिंब मिळेल का...
तो तुझाच राहू दे...
त्याच्या पावलाखालची...
चिमूटभर ओली माती
भांगात भरायला देशील का ?

• •

## 10

तुझ्या डोळयांत निळं आभाळ
तू नेहमीच म्हणत होतास

पण–आभाळाची वेदना ठाऊक आहे तुला ?
ते कुणाचंच नसतं
सगळयांचं असूनसुद्धा !

क्षणोक्षणी रंग बदलणारं
काळं निळं आणि सोनेरी

सारे दुरुनच कौतुक करतात
स्पर्श करायला धजत नाही कुणीच !

भेटायला जावं तर म्हणतात
वेडयांनो
आभाळ म्हणजे आभास आहे
फक्त एक
मोठ्ठी मोठ्ठी पोकळी !

• •

# ११

प्रत्येक क्षण येतो,
माथ्यावरती ओझं घेउन...
प्रत्येक वळण येते,
वेबळी वाट सुचवणारी...
तुझ्या पावलांची निळी सावली कधीच दूर गेलेली असते.
तुझ्या स्वरांत भिजलेला प्रीतीगंध – कधीचाच दुरावला असतो.
तुझा स्पर्श मखमाली
कधीचाच रुसलेला असतो.
झिंग अवघ्या गात्रागात्रातून–
कधीचीच ओसरलेली असते.
प्रत्येक चाहूल घेता घेता.
डोळे कधीचेच थकले असतात...
आणि तुझी वाट पाहाता पाहाता मीच वाट बनलेली असते,
तुझ्या पाउलखुणा हृदयाशी जपण्याची–
वेडी आशा उरांत बाळगून...

● ●

## १२

एकच क्षण..
झेपावणाऱ्या वादळाप्रमाणं-
सारं उलथून टाकणारा...
युगायुगांची तपस्या मातीमोल करणारा...
साऱ्याच जपलेल्या खुणांना मिटवून ..

जगण्यासारखं फक्त वादळच
वादळालाच जमतं वादळ जगणं
लाटांचं तांडव
वाऱ्याचं थैमान-

निर्जीव डबक्यांतलं
रेखीव सुंदर सोनेरी आयुष्य
आणि सामोरी येणारा
उध्वस्त क्षण-
युगायुगांची तपस्या भंगवणारा...

तपस्या तरी कशासाठी
एका शांत किनाऱ्यासाठी
जर वादळच किनारा बनत असेल तर ?
पण...
पाय टेकताच किनारा होणार आहे उध्वस्त...
तरीही क्षणाचा किनारा
वादळाचा क्षण जपायलाच हवा
आयुष्य भिरकावणाऱ्या कलंदरांनो,

अगतिक मानवाला हा प्रश्न विचारायलाच हवा का?
क्षण जपायचा मनांत–
वादळ जपायचं उरांत–
आणि जगायचं डबक्यात...
वेड्या कलंदरा,
हा समुद्रहि नकोसा होइल कदाचित
जेव्हा तो कायमसाठी माझा होईल.

● ●

## 13

आयुष्याच्या चिंधड्या करून
मी खिडकीतून खाली फेकल्या–
तेव्हा तू खिडकीखालीच उभा होतास ना ?
वाऱ्याच्या लहरीवर हेलकावे खाणाऱ्या
कपट्यांकडं मिस्कीलपणानं पहात...

मग एकदमच एखाद्या तुकड्याला
वाचवण्यासाठी
कशाला उरस्फोड करीत सुटलास

हं ! म्हणे रात्रीनंतर दिवस येणारच !
पण मध्यान्ह झाल्यावर
सावलीसुद्धा तुझ्यासारखीच बनते की...

शब्दांच्या जंजाळात गुंतून पडून
हातातल्या कपट्यांकडे पुन्हा पुन्हा कशाला पाहतोस ?

जीर्ण चिंधीचं महावस्त्र करण्याचा आटापीटा
निःसंगानीच करावा.

चौकटीतल्या चित्रांना
क्षितिजाची काय ओळख ?

म्हणून म्हणते
फेक तो कपटा.
जाउ दे त्याला कुठंहि

वावटळीच्या झोताबरोबर
सागराच्या पलीकडे
चांदण्यांच्या देशात
नाहीतर निशाचरांच्या राज्यात
त्याचा वेग तुला काय पेलणार ?

तू आपला तसाच बैस
स्वप्नांच्या माळा करीत
शब्दांचे वळेसर ओवीत

दुसऱ्या खिडकीच्या शोधात...

## १४

येऊ दे अशी वावटळ
होउ देत अशी आवर्तें
त्या आवर्तात भान विसरून होउ दे सामील मला

येऊ देत अशी आवर्तें
जी देणार नाहीत फुरसद
सावरायला देखील मला...

होउ देत अशी आवर्तें
पायाखालची जमिन सुटू दे.
अस्मानाची जाण नसू दे.
मला त्यात हरवून जाऊ दे.

सभोवती उभा राहू दे
असा पडदा धुळीचा
पडद्यापलीकडच्या सत्याचा
विसर मला पडू दे.

होउ देत अशी आवर्तें
आयुष्याला भोवळ आणणारी
माझं 'मी' पण भोवंडणारी
जी मला देतील
फक्त वेडा वाकडा वेग
मृत्युला जाऊन भिडणारा

मृत्युला देखील अस्पर्श राहून
मृत्यु देणारा
प्रचंड भीषण
वेग...वेग...
...वेग...

● ●

## १५

पायाखाली ठाव घसरतो
तेव्हा गाणे असे बहकते

शब्दांच्या खिडक्यातून उघडचा
स्वप्न खुळे डोकावून बघते

बेरीज आणि वजाबाकीचे
गणित सारे चुकून जाते

प्रतिष्ठेतली अवघी शिल्लक
कधी अचानक सरून जाते

रेशीमकोषी वस्त्रामधली
आभाच सारी विरून जाते

गंधबावरी अनामिका कुणी...
प्रीतीसाठी झुरून मरते

## १६

माझ्या डोळ्यांतल्या अश्रूंनी
होतोस तू विद्ध माझ्यासाठी
तो अश्रू माझा नाही.
त्यात तर तुझीच वेदना आहे.

माझा अश्रू गिळून टाकेल तुला
समुद्र बनून !

माझ्या डोळ्यांत शोधताना
स्वप्नपक्षी...
तुला दिसतील गिधाडं !
जखमी स्वप्नपक्ष्याभोवती जमलेली
बुभुक्षित नजरेची !

विस्कटलेल्या पंखांचा
चोंच वासलेला
स्वप्नपक्षी पाहून
होशील तू घायाळ...

तुझ्या त्या वेदनेचा तीर
माझ्या पत्थर हृदयाला
छेदून जातो
एखाद्या बेसावध क्षणी...

म्हणून आली आज
हा बेसावध अश्रू

त्यात तू हरवू नकोस
नाही तर स्वत:लाच
हरवून बसशील
पुन्हा न सापडण्यासाठी

• •

## १७

स्वप्नांच्या सेतूंनी तरून गेलो
व्यवहाराच्या सागरापलीकडे-
तिथेच तू भेटलीस
भेटले तुझे निळेशार फसवे डोळे,
आर्ततेने जवळ बोलावणारी तुझी ती विद्ध नजर...
तुझ्या हातांच्या ओंजळीत
तिथेच प्राजक्ताचा सडा घातला...
आणि सुगंधाच्या लयीबरोबर सारे विश्व
विरघळून विरघळून गेले.
आणि...
आणि तिथंच पडले ढासळून सारे स्वप्नांचे सेतू
मी राहिलो अवकाशात अधांतरीच
त्रिशंकुचा वारस बनून...
तिथंच उमटलेल्या पावलांच्या खुणा शोधत प्रवास केला.
तरी वाट सरेच ना
वाट पाहीली तृषार्त चातक बनून
पण...
सुखाचा थेंब भेटेचना
तहान भागेचना...
भागेचना...

## १८

उरात पेटली आहे अशी आग
विझवायला पुरायचे नाहीत साती सागर सुद्धा ..

माझ्याच पातकांच्या.
सप्तपाताळातल्या राक्षसाला
फुटली आहे वाचा,
घालतो आहे तांडव तो
विकट हास्य करीत...

हाताला लागलेल्या
रक्ताने रंगलेल्या
सावल्या नि छाया
भेडसावताहेत
माझ्या गळ्याभोवती
लांब बोटांची पकड आवळीत...

पण जीव मात्र जाता जात नाही.
नुसताच गुदमरतोय मी
आंचके देत...

ज्या सत्याची आणि पावित्र्याची
घेतली मी अब्रू
त्यावेळी नव्हती वाटली काही खंत
पण आज ते वस्त्रविहीन हिडीस रूप बघवत नाही
माझ्याच हातांनी घडवलेलं

मृत्यू देखील करतोय माझी घृणा
मीच माझ्या कृत्यांनी
उगवलाय
माझ्यावर सूड.

● ●

## १९

कधी अचानक राजपथावर
नयनामधले गीत गवसले
कृष्ण व्यथांचे विषण्ण ओझे
बघता बघता विरून गेले

कधी अचानक यमुनाकाठी
हरवून गेल्या गंधित रात्री
गंधबावरी प्रीत फुलावी
स्पर्श बावऱ्या कोमल गात्री

कधी अचानक राजपथावर
स्वप्ने गहिरी हरवून गेली
कृष्ण व्यथांचे विषण्ण ओझे
माथ्यावरती मिरवून गेली

कधी अचानक राजपथावर.

# १०

रात्रीला अजून पंख फुटले नव्हते. .
शब्दांना अजून सूर गवसला नव्हता
चंद्राची तोंड-ओळखसुद्धा झाली नव्हती...

माझ्या खोलीच्या खिडकीतून
दूरवर जाणारा
एक रस्ता दिसत होता...

त्याच्यावर अजून पाऊलखुणा उमटल्या नव्हत्या.

तेव्हा रस्त्याच्या कडेला
एक भिकारी बसला होता.
त्यानं तो रस्ता गुंडाळून ठेवला
आपल्या झोळीत.

आकाशातला चंद्र खुडून
फाटक्या चिंधीत लपवून ठेवला.
कुणाच्याहि नकळत...

पण मी ते पहात होते
तेव्हा मला हजार डोळे फुटले होते.

आताचा चंद्र आहे ना
तो खोटा खोटा आहे.
हे कुणाला माहिती नाही माझ्याशिवाय!

म्हणून मला तो नको आहे
अलगद तोडून
कुणी ओंजळीत टाकला
तरी सुद्धा... !

● ●

## ०१

जीवनातली सुखस्वप्न
रातराणीच्या गंधात भिजलेल्या
जुइरंगी चांदण्या रात्री
बकुळीचे हार
प्राजक्ताच्या पायघड्या
लाल निळा संधिप्रकाश
हे सारं सारं
तुझं आहे.

काळेशार डोळे
नितळ गुलाबी कांती
लांब सडक बोटावरची
निळी भुरी लव...
लाल चुटुक ओठावरचं
हळवं हळवं प्रेमगीत
हे सारं तुझं आहे.

आणि माझं...

आयुष्याच्या वाळवंटातली ही एकाकी दीर्घ वाट
तापलेल्या वाळूचे बसणारे चटके
आयुष्याच्या गर्भातली दुर्दैवी चुकामूक
भावनेचा गुंता
न उकलणारा
निळी काळी वास्तवता
चारी बाजूनी वेढून टाकणारी...

उदास काळोखा एकाकीपणा
आ वासून गिळायला टपलेला
अश्वत्थाम्याच्या जखमेप्रमाणं
सदा ताजी जखम
उरी घेउन फिरायला लावणारं दैव...

जे केवळ एकच असं आहे
की ते माझं आहे.
यातच मला आनंद आहे
की ते माझं आहे.
माझं...
माझं एकटीचं...

## ११

माझ्या प्रीतीची रे रीत स्वैर उनाडपणाची
साध्या भोळ्या मुशाफिरा तुला नाही पेलायची
भाव नाजुक गुंफून
नाही प्रेम मी दाविले
अंतरीच्या भावनांना
शब्दी नाहीच बांधिले

आणि वियोग जाणीवे
नाही अश्रू ओघळले
माझ्या मनाचे कवाड
सदा रितेच राहिले

तिथे किती जण येती
डोकावती घाबरती
मूर्तिमंत चंचलता
आणि मजला म्हणती

पण कसे सांगू त्याना
मला नावडे याचना
जे जे करीती वंचना
त्यांची मजला कामना

जर इच्छिसी माझ्या प्रेमा,
दूर मला करूनी जा
आणि स्मृतीच्या पोकळीत
शीळ गुंफित निघूनी जा...

• •

## १३

मज नकोच वेड्या दान तुझ्या प्रीतीचे
मज नकोच नाते तसले जन्मांतरीचे

मज नकोच पोकळ शब्दांची बरसात
मज नकोच हळवी गंधित केशरी रात

मज नकोत वेडी स्वप्ने वेडी वचने
तू देशिल जर ती कधी बनून शहाणे

मज एक हवे तू सतत शराबी बनावे
मी बनून साकी तुला मद्य पाजावे

ही झिंग सख्या अशी नसानसात भिनावी
तुज कधी जगाची शुद्ध न वेड्या यावी।

मी साकी जशी मी,–मीच शराब बनावे
तू धुंद होउनी मलाच पिऊनी जावे...

## १४

अजून मला आठवते
तुझ्या डोळ्यांतली निळी व्यथा
दीर्घ तुझा श्वास गहन
त्यातले ते दुःख बोलके
अजून मला आठवते

मला अजून आठवते
शीळ तुझी कांपरी
आणि त्यातून दिसणारी
व्यथा तुझी थरथरणारी

आणि मला आठवते
होउन भावनाविवश तू
दुःख तुझे सांगितलेस
करवंदीच्या जाळ्यांना
रातराणीच्या सुगंधाला
निथळणाऱ्या चांदण्याला
पण मला नाही आठवत...

पण मला नाही आठवत ...

घातली का रे समजूत त्यांनी
विसरल्या का रे व्यथा साऱ्या
धुंद त्यांच्या निःश्वासांनी
कधीच मला नाही आठवत

खरंच मला नाही आठवत...

● ●

## २५

माझे काळेशार डोळे
त्यात चमक निराळी
त्यात झलक वेगळी
खुळ्या भावुक तरुणा
तुला नाही कळायाची

किती जळते विखार
माझ्या डोळ्यात नांदती
माझे काळेशार डोळे
त्यात वेगळीच मूर्ति

माझ्या नजरेची भाषा
आहे आगळी वेगळी
नाही तरुण मनाची
नाही उन्मत्त प्रेमाची

माझ्या नजरेची भाषा
आहे अगम्य अतर्क्य
सदा स्फुल्लिग फुलते
येथ क्रांतीचे पेटते
आणि नंदादीप संथ
नित्य तेवते भक्तीचे

किती वेदांची जाहली
माझ्या कटाक्षे विभूति
आणि आगळचा वेदांची
नित्य निराळी निर्मिति
माझे काळेशार डोळे
डोह यमुनेचे खोल
त्याचा थांग मुशाफिरा
नको शोधूस उगाच

● ●

## १६

कधी समेवर सूर अडखळतो
काजळकाठी दवात भिजतो
गंधभारल्या श्वासासंगे
मैफलीतूनी उठून जातो

आणि बैसता कधी एकांती
नदीकांठच्या वाळूवरती
कुणी अनामिक शीळ घालता
मला अचानक गवसून जातो.

तो माझा सूर ..

जो माझा सूर माझा असूनी
माझा नाही–

ऊर फुटेतो गिरक्या घेउनी
कधीच मजला गवसत नाही–

डोळ्यामधल्या निळ्या आकाशी
गंधगुलाबी बनून मिळतो
तो माझा सूर...

# १७

लाल रंगच हवा होता
तर कशाला उधळतोस रक्त
नाजूक हात मेंदीभरले
कुणाचेतरी
तिष्ठत होतेच की तुझ्यासाठी

कशाला सांगतोस
जळत्या चितेची भाषा ?
पोटातली आग चिमण्या बाळांच्या
गिळून टाकील तुझ्या चितेलाहि

निःसंगच व्हायचं म्हणतोस
तर क्षणभर थांब
बघ सडा पडलाय
पावलाखाली
कुंकवाचा...

तहान लागलीय तुला विनाशाची
पण राखेतून सावली मिळवून देण्यासाठी
करशील कधी निर्माण
एखादा तरी अंकुर ?

रक्तरंजित हातानं कुणाच्या भांगात
भरणार असलास सिंदूर तर
सदासाठी
रक्त तुला देउ
आमचेहि !...

● ●

## १८

दोनच दिवसांपुरते नुसते
मुग्ध. . .जुळावे आपुले नाते

दोनच दिवसापुरती नुसती
आकाशाची झूल झुलावी
फुलल्या वाचूनी कळी रुसावी
सरिता आणि थिजूनी जावी

दोनच दिवसापुरते नुसते
सूर्यानेहि नयेच उगवू
प्राजक्ताच्या लाल ओठीचे
गुपित आणि नयेच सुकवू

दोनच दिवसापुरती नुसती
ताऱ्यांची बरसात थबकू दे
रातराणीच्या गंधप्रीतीची
अंधाराला मिठी पडू दे

दोनच दिवसापुरती नुसती
जगास अवघ्या भूल पडावी
मिठीत भावुक विद्ध जीवांच्या
मृत्युचीहि राख बनावी. . .

● ●

## ३९

अस्ताईचे सूर रेंगाळताहेत कशासाठी ?
भैरवीसुद्धा संपून गेली आहे कधीचीच...
पण अजून माझा सूरच लागत नाही.
मैफलीतून उठून गेला आहेस कधीचाच...
पण...
तुझ्या मनगटावरचा
सुकलेला मोगऱ्याचा गजरा
मला मैफल संपवूच देत नाही...

● ●

॥ २ ॥

**वासुदेव देशपांडे 'चंद्रशेखर'**

१

शब्द अवघे पोकळ असतात
आभासाचे डोंगर–
उल्लंघून पहावं म्हटलं भावनेला खोली किती
तर तिथं नसतंच अस्तित्व डोंगराचं !
शब्द म्हणजे असतं
सोनेरी वर्ख नुसतं !
त्याच्यावर विश्वासून आयुष्याचं सोनं करावं म्हटलं–
तर हाती उरते...
फक्त फक्त बेगडं !
शब्द नुसते खेळ असतात
कातरवेळी खेळायचे...
...भावनेच्या लाटेवर बसून
एकमेकाकडं फेकायचे–
शब्द अवघे गहिवर असतात
प्राजक्तावरच्या दहिवरासारखे
जाणीवेच्या चाहुलीनं...
पार आकसून जाणारे
कारण...
कारण शब्द बिचारे दुर्बळ असतात–
शब्द सगळे दुर्बळ असतात...
नियतीच्या हातातील दुर्बळ दुखऱ्या बाहुल्यांचे
शब्द बिचारे दुर्बळ असतात...
शब्द देणाऱ्या दुर्बळांचे...

● ●

## ७

पाचाचं हे देणं
वागवितो लेणं
साडेतीन हात
माणसाचं जिणं

आला कधी दारी
संपता शिदोरी
देणं द्याया परी
घाबरतं मन

एकदा एकानं
ज्याचं त्यानं नेलं
उरलं देण्यासी
उतावीळ जन

● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2302
क्र.
29578
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

**3**

अशाच कातरवेळी
टांगलेलं असतं दारांना...
वटवाघळाचं तोरण
अन् पाली कशा वेलबुट्टीने उभ्या
भिंतीभिंतीवर नक्षीदारपणे...
फडफडत...
चुकचुकत...संथपणे...
दुखवटा पाळणाऱ्या
निराशेच्या सुरावटीला साथ देत
उदासीच्या रंगाने सजविलेली
एक अशीच मुहुर्तवेळ
आत जावं की बाहेर
हेच कळत नाही.
एक पाऊल आत...
एक पाऊल बाहेर
पण बाहेरचं कोणतं ?
अन् आतलं कोणतं...
हेच नाही कळत...

४

तुला जर रुसायचंच असेल
तर परत हासण्यासाठीच रुस
पण तू अशी रुसू नकोस
जशी दिली आहे तुला काळाने फूस

तू नेहमीच नेत्र मिटून घेतेस
प्रेमाचे कटाक्ष फेकण्यासाठी
पण आज ते मिटले आहेस
कटाक्षाने न उघडण्यासाठी

मला अजूनहि वाटतं
तू केव्हाहि खुदकन् हासशील
प्रेमाचा एकच कटाक्ष
माझ्याकडे फेकून देशील

खळाळते तुझे हास्य...
...खळाळते तुझे हास्य
अन् ...
गळ्यातले तुझे बाहू
न बोलताही बोलून जातील
कशी तुमची मज्जा केली
अन्...
...अन् एकदम मी भकास हासलो
नंतर सतत खळखळून
कुणी माझी कीव केली

आणि दिले वेडा ठरवून
अरे वेडयांनो,
अरे वेडयांनो कोण वेडा
मी आहे का तुम्ही
कुठे नेताय तुम्ही तिला
थांबा, ती बोलेल काही !

● ●

# ५

निर्माल्यातून
पुन्हा फुलं निर्माणायची शक्ति
निसर्गांत खासच नाही.
आशा होती...
तुझ्या डोळयात ती एकदा तरी दिसू शकेल–
पण...
...तुझे डोळे . ?
सुरेख चेहेऱ्याला शोभेशा
दोन गारगोटयावर चितारलेले डोळे.
अन् माझ्या सुखाच्या बाहुलीचे दोन डोळे
सदैव उघडे होते
अवघडून–...
. .–आशेने...
तुझ्या डोळयातल्या निसर्गाच्या प्रतीक्षेत ..
पण...
आता माझी बाहुली झोपली आहे
तिच्या डोळयातल्या बाहुल्या वर करून...

● ●

## ६

आठवणींच्या पायघड्यावरून चालतो
अन् पाय पुन्हा रक्ताने न्हातात
ओळीने साऱ्या दुःखाच्याच कसे
पावलांचे ठसे उमटतात ?

याच ठशावरून चालता चालता
माझ्या प्रेमाला मी खांदा दिलाय
असा पथिक मीच मी
या रस्त्याने कोण गेलाय
सारं ओझं झेलत झेलत
एकट्यानंच मला चाललं पाहिजे
कोण करेल भागीदारी
आणि केली तरी नको आहे.

• •

## ७

या निळ्या शांत कातळावर
पांढरा पर्वत . .
हत्तीच्या पावलांनी उभा आहे.
ही मलूल मरगळलेली मान
त्या खात्या खवळलेल्या दाढा
हे रक्ताळलेले गढूळ डोळे
त्या लवलवणाऱ्या लाललाल जिभा

हे लटकते लटपटते पाय
ती आशेची वाळलेली जीर्ण फांदी
हा शीर धरून लोंबणारा देह
इतकीच आता मुभा आहे—

● ●

## ८

असे सूर जाती
नसे त्या किनारा
न येती समेवर
न फुलतो फुलोरा

न बंध रेशमाचे
न गोफ गुंफियेले
अशा सांज वेळी
विकल गात्र उरले

नसे खंत त्याची
न दिसे प्रीत मनाची
न ये हाक ऐकू
कुणाची कुणाला

● ●

९

ही वेडी फुंकर
धावते...
वाहते प्राण ओतून
हळुवारपणे
निःशब्द...
चाचपडत...
दाह कमी करण्यासाठी
मालवण्यास...
स्वतःच्या ओठाला होरपळून घेत.
तिला काय ठाऊक ?
समोर ज्योत नाही...
...आहेत ते जळते निखारे
प्रत्येक फुंकरीबरोबर पुन्हा पुन्हा धगधगणारे
नव्या जोमाने, दाह वाढवत
पण...
ओठांनाही त्याचे भान नाही

● ●

## 10

मला अंगदी कंटाळा आलाय,
हे चक्रव्यूह भेदताच येत नाही.
अनंतकाळ प्रतिक्षा करतोय.
कुणी मला भेटतच नाही...

झोपेतून उठतो–चार पावले चालतो.
वळून पाहतो. तर मी झोपलेलाच दिसतो.
मी चिडतो. माझ्या डोळ्यात अंगार फुलतो.
झोपलेल्या माझ्या उरात मीच खंजीर खुपसतो.

एक आर्त किंकाळी उठते अन् सारं काही शांत होतं.
खून केलाय या कल्पनेने माझं मन घाबरतं.
हात पाय लटपटतात, घशाला पडते कोरड !
फांशीवाचून सुटका नाही-मनाची आतून ओरड !

इतरांनी लटकवण्या ऐवजी...स्वतःच लटकलेले बरे...
याच विचारात गळ्यात दोर, अन् पायाखालचे स्टूल सरे
सुटलो या भावनेने तशातही सुखावतो.
बुबळे बाहेर काढून मी माझेच प्रेत हुडकतो.

हास्याची एक लकेर माझ्या ओठांवर दिसू लागते.
शेवटचा श्वास तुटतो अन् माझे प्रेत उठून बसते.
मी पाहतो, माझे प्रेत आढयाला लोंबकळत असते.
हे सर्व माझ्याचमुळे याची मला जाणीव होते.

सुटका करून घेण्यासाठी जीव तोडून धाव घेतो...
पाहतो तो वारंवार, आहे तिथेच येऊन पोंचतो
एव्हाना मी दमलेला असतो, कसा तरी तेथेच झोपतो
झोपता झोपता झोपेतच याची उजळणी करीत असतो...

याचा मला आता फार कंटाळा आलाय
हे चक्रव्यूह भेदताच येत नाही
अनंतकाळ प्रतिक्षा करतोय
पण कुणी मला भेटतंच नाहीय...

● ●

## ११

ओढून अंगावर धुकं
गाव झोपलं होतं
डोंगराच्या कुशीत

डोकं वर करून
एक झाड उभं
खडा पहारा करीत

पूर्वेच्या रंगरंगोटीने
रात्रीला चिकटलेला अंधार
मलूल झाला होता

तिनं 'काळं' केलं होतं
पुन्हा भेटण्यासाठी
त्याच्या आधीच—

• •

## १७

फुटे पालवी अडीच अक्षरी
भर दुपारचे ऊन चंदेरी
पंखामधुनी गीत रंगूनी
सुरवंटाचे होत पांखरू

पतझ्झट होता आणि अचानक
पंखामधला रंगहि झडतो.
अर्थहि थिजतो अक्षरातला
शब्दाची मग विझते जाणीव

बनून कलेवर थंडगार अति
शापित कंपित शुष्क डहाळ्या
थरथरणारी तीच अक्षरे
केवळ उरती अडीच अक्षरे

• •

## १३

सखे तुझ्या नजरेचा नजराणा
मखमली कोंदणात मोहोरबंद
त्यावर काजळ–कट्यार धारदार
काळीज चिरते आरपार

अजून रेंगाळतो सूर बेसूर होऊन
तुझ्या भैरवीच्या काठावर येतो
ओला शहारा या ओल्या मायेवर
अन् कळी करपली मेल्या कायेवर

झेपावले उत्तुंग कड्यावरून
'जीवन' झाले बेबंद
सुरू झाली डूब पेल्यात
तरंगते मन होउ दे धुंद

रुसली आहे झोप कधीचीच
झिंग कशी जिवंत जागी
मिटल्या डोळ्यांना दिसते
कट्यार खुपते जागोजागी

• •

## १४

तू अशीच उभी राहणार आहेस का ?
चांदण्याची खडी काढलेली अंधाराची साडी लपेटून
प्रेमात दुःख मिळाले म्हणून हृदयाची कवाडे बंद करून
आत कोंडमारा सहन करीत...

भग्न हृदयाचा चुराडा उराशी बाळगून
आकाशाकडे झेपावणाऱ्या हिमालयासह
मीलनाच्या आशेने धांवणारी पृथ्वी
किती दुःखी आहे हे तुला कोठे ठाऊक ?

● ●

१५

मी भृंगराज वेडा
मजला सुगंध वेड
मधु चाखितो कणाने
जेथून ये सुगंध

त्या पाकळ्या विखुरल्या
नाही कधी विसरल्या
मधु सेविला ऋणाने
ओठासी या बिलगला

ही चूक का म्हणावी
हा शाप या जिवाला
उरी खंत हीच जाळी
या यातना मनाला

मजला हवेत वेडे
ते बंध रेशमाचे
जखडून पार घ्यावे
मन त्यात गुंतवावे

कोणी न साथ देइ
भेटे कधी कमलिनी
मज मुक्त मुक्त वाटे
त्या बंधनामधेही...

● ●

## १६

मी एक चित्र काढले होते आयुष्याचे
अन् ठेवले होते अगदी जपून
पण आज त्याच रंगीबेरंगी चित्राचे
बरेच रंग उडून गेले आहेत.

जिथे जो रंग असायला हवा
तिथे नव्हता रंगच शिल्लक
जागोजागी उपेक्षिलेले
रंग कसे फुटले आहेत.

उरलेल्या ठिकाणचा रंग देखील
पार विटून गेला आहे
आयुष्याचे चित्र कसे
मॉडर्न आर्ट बनले आहे

● ●

# १७

हा थकला जीव टेकला आहे
घटकाभर मोकळा श्वास घेण्यासाठी
हळवं मन गोंजारीत हळूवारपणे
दुखलं खुपलं विसरण्यासाठी

बेरजा वजाबाक्या कधीच संपल्या
आता सारं काही पुसायचं आहे.
या धुरकटल्या नजरेला आता
दिसेनासं झालं आहे

पुसट केव्हातरी दिसतं
तेव्हा ते शोधतात जिव्हाळा
आतल्या गर्भाच्या ओल्या मातीचा
शाश्वत दिलासा देणारा

या मातीचा स्पर्श आगळा
मंद दरवळे गंध वेगळा
स्पर्शासाठी, गंधासाठी
आसुसलेला देह निवाला

REFBK-0021614
REFBK-0021614
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2302
वा. क्र. 29594

